# छंद पुष्परचनेचा - २



कोणत्याही प्रकारची पुष्परचना करायची असेल तर त्यासाठी थोडी पूर्वतयारी आवश्यक असते. पुष्परचनेसाठी लागणारे साहीत्य, त्यामागचे शास्त्र, नियम माहीती असणे गरजेचे आहे.

**<u>पुष्परचनेसाठी लागणारे साहीत्य</u>**

१. फ़ुले- पुष्परचनेमध्ये वापरायची फुले ताजी, टिकाऊ व पुष्परचनेतील रंगसंगतीचा विचार करुन निवडावीत. फ़्लोरीस्ट्कडॆ अनेक प्रकारची शेवन्ती, आर्किड, गुलाब, कार्नेशन,जर्बेरा,लिली, डेज़ी,टूलिप्स,आयरिस,स्टॅटीस,अन्थुरियम इत्यादी प्रकारची फुले उपलब्ध असतात.

२. फांद्या - फांद्यांची किवा पानांची निवड ही अत्यंत महत्वाची असते.फ़्लोरीस्टकडॆ

पाम, ड्रेसिना, फर्न, मनी प्लॅन्ट इत्यादी पाने मिळतात. हवामानानुसार वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या प्रकारची झाडे वाढ्त असतात. थंड हवामानात ओक, पाईन, फर, मेपल, चेरी, बेरीज तर उष्ण हवामानात चिक्कू, अनंत, कामिनी, जास्वंदी, तगरी, मोगरा ,जाई, जुई इत्यादी झाडांच्या फाद्यांचा वापर करता येतो. याशिवाय गवत, वाळलेल्या फांद्या, काड्या अथवा मुळे, खोड अशा गोष्टींचा उपयोग करुन सहज सुंदर रचना करता येतात.



३. पुष्पपात्रे - विविध आकाराची पुष्पपात्रे  वापरता येतात. इकेनोबो स्कूलची खास आकाराची

अशी काही पुष्पपात्रे मिळतात. पुष्पपात्र निवडताना  पुष्परचनेकडे अधिक लक्ष वेधले जाईल असे पुष्पपात्र निवडावे. नक्षीदार किंवा चकचकीत पुष्पपात्र वापरु नये. भारतीय स्वयंपाकात वापरली जाणारी अनेक तांब्या पितळ्याची भांडी, घागर, घंगाळे, समई, ताम्हन तसेच बांबुच्या काडया, टोपल्या, मॅट्स्, परडया यांचा वापर करता येतो. काही वेळा पुष्पपात्र न वापरता सुद्धा  रचना करता येतात.



२. कात्री- फुले व फांद्या कापण्य़ासाठी पुष्परचनेच्या अशा खास कात्र्या मिळतात. नेहमीची धार असलेली कात्री सुद्धा वापरता येते.

३. पिन होल्डर- पाने व फुले खोचण्यासाठी याचा वापर करतात. धातुच्या जाड व गोल चकतीवर धातुच्या पिना बसविलेल्या असतात. निरनिराळ्या आकाराचे पिन होल्डर बाजारात उपलब्ध असतात. खुप वेळा पिन होल्डरच्या ऐवजी फ्लोरल स्पंज किंवा

ओएॅसिस वापरतात. फ्लोरल स्पंज फ्लोरीस्टकडे मिळतो. फ्लोरल स्पंज प्रथम आवश्यक त्या आकाराचा कापून, भरपूर वेळ (४ ते ५ मिनिट) पाण्यात भिजवून मग रचना करताना वापरावा.

५. पाणी- ज्या पुष्पपात्रामध्ये रचना करायची असेल त्यात प्रथम पाणी भरणे आवश्यक असते.

६. याशिवाय टाचण्या, बारीक व जाड तार, पक्कड, सुरी, रबर बॅन्ड, फ्लोरल टेप, साधी कात्री, मार्बल चिप्स्, नॅपकिन इत्यादी गोष्टी जवळ असणे आवश्यक आहे.

**पुष्परचना करण्याआधी -**

१. पुष्परचना करण्याआधी सर्व साहीत्याची निवड व योजना करावी.

२. पुष्परचना कोठे ठेवायची याचा विचार करुन त्याप्रमाणे पुष्पपात्राची निवड करावी.

३. पुष्पपात्राचा रंग व फुले, पाने, फांद्या यांची रंगसंगती यांचा संगम साधला जावा.

४. फांदीचे सौंदर्य फांदीच्या डौलात असते.तो डौल उठुन दिसण्यासाठी फांदीवरील अनावश्यक पाने काढुन टाकावीत. कित्येकदा तारा व फ्लोरल टेप वापरुन फांद्याना आवश्यक असे वळण अथवा डौल देता येतो. फांद्या, पाने, फुलांचे देठ गरजेनुसार वाकवण्याच्या विशिष्ठ पद्धती आहेत.

५. कित्येक वेळा पाने, फुले एखाद्या दिवसात पाण्यात ठेवूनही सुकतात. तेव्हा निवड करताना टिकणारी पाने फुले वापरावीत. फुले, पाने, फांद्या जमवल्यावर लगेच भरपूर पाण्यात त्याची देठे बुडवून ठेवावीत.

६. पुष्परचना करताना फांद्या, पाने व फुले यांच्या वापरातुन जेवढ्या सुंदर रेषा (line work) निर्माण करता येतील तितक्या त्या पुष्परचना लक्ष वेधून घेतील.

**पुष्परचनेचे मुख्य प्रकार ---**

इकेनोबो स्कूलच्या पद्धतीनुसार पुष्परचनेचे पाच मुख्य प्रकार मानले जातात.

१.रिक्का - पुष्परचना करायला जेव्हा सुरुवात झाली तेव्हा रिक्का रचना प्रथम केल्या गेल्या. ह्या रचना खुप मोठ्या व करायला अवघड असतात. अनेक प्रकारची

पाने, फुले फांद्या यांचा समावेश यात केलेला असतो. या रचनांची सुरुवात साधारण सोळाव्या शतकात झाली.

२.शोका - रिक्का रचना सर्वांना करायला अवघड असल्यामुळे त्यातुन शोका रचनेचा

जन्म झाला. इकेनोबो स्कूलच्या या अत्यंत खास व महत्वाच्या मानलेल्या रचना आहेत. फुलापानांच्या निवडीनुसार याचे अनेक उपप्रकार आहेत.

३.मोरिबाना - ह्या प्रकारच्या रचना करायला अठराव्या शतकात सुरुवात झाली.याला आधुनिक प्रकारच्या रचना म्हणता येईल. पुष्परचना कलेचा जसा प्रसार व आवड लोकांमधे वाढू लागली त्यानुसार या थोड्या सोप्या व नवीन शिकणाऱ्यांना सहज जमतील,आवडतील अशा मोरिबाना रचना करायला सुरुवात झाली.

४.नागेरी - मोरिबाना शिकल्यानंतर या रचना शिकता येतात. पिन होल्डर किंवा फ्लोरल स्पंज न वापरता या रचना केल्या जातात.

५.मुक्तरचना - यालाही आधुनिक रचना म्हणतात.पारंपारिक रचना काही ठराविक नियमानुसार केल्या जातात. ते सर्व नियम मुक्तरचनेमध्ये थोडे शिथिल केलेले आहेत.

रचना करणारी व्यक्ति स्वत:च्या मनातील भावना यातुन मांडू शकते. एखादा विषय

घेऊन त्याप्रमाणे रचनेची मांडणी करता येते. पौर्वात्य व पाश्चिमात्य रचनांचा मिलाफ यात आढळतो. अनेक प्रकारचे कृत्रिम साहीत्य यात वापरले जाते. या रचना आपल्या आवडीप्रमाणे कितीही लहान किंवा खूप मोठ्या पण करता येतात. या रचना करताना कल्पनाशक्तीला भरपूर वाव देता येतो.

पुढील लेखात आपण पुष्परचनेचे नियम व मोरीबाना रचनांची माहीती घेऊ.

**सौ.अरुंधती शिरीष देशपांडे**

**मेंबर, इकेनोबो इकेबाना फ्लोरल आर्ट,जपान**

asdssd@gmail.com

(मराठी विश्व,न्यूजर्सी यांच्या सौजन्याने)